सकाळ
रविवार
नागपूर, १२ फेब्रुवारी २०१७ । किंमत ₹ ४




नागपूर : दोनदिवसीय कार्यशाळेत बोलताना कुलगुरू डॉ. गिरीवर मिश्र; बाजूला डॉ. राजश्री वैष्णव, डॉ. शिवस्वरूप व डॉ. मुकुल कानिटकर.

# कोचिंग क्लासेस 'काळे शिक्षण' देणाऱ्या संस्था

## कुलगुरू डॉ. गिरीवर मिश्र यांची टीका

**सकाळ वृत्तसेवा**

नागपूर, ता. ११ : देशात मोठ्या प्रमाणात काळा पैसा असल्याचे बोलल्या जाते. मात्र, खऱ्या अर्थाने कोचिंग क्लासेसमध्ये विद्यार्थ्यांना काळे शिक्षण दिल्या जात असल्याची टीका महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. गिरीवर मिश्र यांनी केली.

इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठ, भारतीय शिक्षण मंडळ आणि नागपूर विद्यापीठाच्या स्नातकोत्तर शिक्षण विभागाच्या वतीने 'शिक्षण प्रणाली : भूत, वर्तमान आणि भविष्य' विषयावर विभागातील सभागृहात आयोजित दोनदिवसीय कार्यशाळेत ते बोलत होते. कार्यक्रमाला विभागीय केंद्राचे संचालक डॉ. शिवस्वरूप, भारतीय शिक्षण मंडळाचे डॉ. मुकुल कानेटकर, विभागप्रमुख डॉ. राजश्री वैष्णव उपस्थित होते.

शिक्षणातून शिक्षक आणि विद्यार्थ्यांमध्ये विश्वासाचे नाते तयार होणे गरजेचे आहे. मात्र, सध्याच्या शिक्षणप्रणालीमध्ये ते दिसून येत नाही, असे डॉ. मिश्र म्हणाले. डॉ. कानेटकर यांनी शिक्षणाची मोठी परंपरा देशात आहे. त्यातून देशच नव्हे, तर जगातील शैक्षणिक समस्यांचे समाधान शोधता येणे शक्य असल्याचे स्पष्ट केले.

यानंतर आयोजित विविध सत्रांत डॉ. राजेश बिनिवाले, कविकुलगुरू कालिदास संस्कृत विद्यापीठाच्या कुलगुरू डॉ. उमा वैद्य, रायसोनी विद्यापीठाच्या कुलगुरू डॉ. कमलसिंग यांनी मार्गदर्शन केले. यानंतर ६९ विद्यार्थ्यांनी संशोधन पेपरचे वाचन केले.

यावेळी भंडारा, गोंदिया, रायपूर, वर्धा, रामटेक व शहरातील विविध महाविद्यालयांचे विद्यार्थी सहभागी झाले होते.

आप पढ़ रहे हैं देश का सबसे विश्वसनीय और नंबर 1 अखबार

# दैनिक भास्कर

SUNDAY

नागपुर 12 फरवरी 2017

## 'हममें है विश्व गुरु बनने की क्षमता'



### ▪ इग्नू के सम्मेलन में विशेषज्ञों ने कहा

**नागपुर** | इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विश्वविद्यालय (इग्नू) क्षेत्रीय केंद्र नागपुर द्वारा गड़चिरोली के छात्रों के लिए और भारतीय शिक्षा प्रणाली पर एक दिवसीय सम्मेलन का आयोजन किया गया। सम्मेलन का विषय 'सार्वकालिक भारतीय शिक्षा प्रणाली अतीत, वर्तमान और भविष्य' था।

भारतीय शिक्षण मंडल और स्नातकोत्तर शिक्षण विभाग, राष्ट्रसंत तुकड़ोजी महाराज नागपुर विश्वविद्यालय के सहयोग से आयोजित सम्मेलन में 69 प्रतिभागियों ने बढ़-चढ़कर भाग लिया और अपने शोध पत्र प्रस्तुत किए एवं 3 कुलपतियों ने सभी को संबोधित किया। डा. गिरीश्वर मिश्र, कुलपति, महात्मा गांधी अंतरराष्ट्रीय हिंदी विश्वविद्यालय, वर्धा उद्घाटन समारोह के लिए मुख्य अतिथि थे। उन्होंने प्रतिभागियों को कक्षा, जहां शिक्षक और छात्र परस्पर विश्वास में एक संपूर्ण वातावरण बनाने की सलाह दी। मुकुल कानेटकर, भारतीय शिक्षण मंडल ने अपने संबोधन में भारत शुरू से ही नालंदा, तक्षशिला जैसे उच्च शिक्षा के लिए पूरी दुनिया में एक महान विरासत होने पर बल दिया। यह सत्र डा. एस.आर. कोमावार, प्रो.टी. श्रीनिवास, डा. एस.आय.कोरेटी, डा. के.एम. वाट, डा. विकास सिंघल, डा. येलेकर, डा. निंबारते जैसे वरिष्ठ शिक्षाविदों की अध्यक्षता में हुआ था। समापन समारोह के मुख्य अतिथि डा. उमा वैद्य, कुलपति, कवि कुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालय, रामटेक थे। सम्मेलन में नागपुर, भंडारा, रामटेक, गोंदिया, रायपुर, वर्धा के शिक्षण विभाग के अध्यापक एवं छात्र शामिल थे। डा. पी. शिवस्वरूप, क्षेत्रीय निदेशक, इग्नू ने रॉयल सोसायटी ऑफ केमिस्ट्री और उसकी गतिविधियों के बारे में छात्रों को जानकारी दी।

तरुण भारत
www.tarunbharat.net
आपलं नागपूर
शुक्रवार, १० फेब्रुवारी २०१७


# परिपूर्ण शिक्षण व्यवस्थेसाठी शिक्षकांनी कार्य करावे

## • मुकुल कानिटकर यांचे प्रतिपादन • इग्नू व भारतीय शिक्षण मंडळाच्या वतीने संमेलन

तभा वृत्तसेवा
नागपूर, ९ फेब्रुवारी

विश्वकल्याणाची शिकवण देणारी भारतीय संस्कृती आहे. ही शिकवण शिक्षणातून आजच्या पिढीला देण्याची गरज आहे. पण शिक्षण व्यवस्था आपले अस्तित्व हरवून बसली आहे. यात अनेक दोष आहेत. ते दूर करण्याची जबाबदारी शिक्षक, प्राध्यापकांवर आहे.




उपस्थितांना संबोधित करताना मुकुल कानिटकर. व्यासपीठावर डॉ. राजश्री वैष्णव, प्रो. गिरीश्वर मिश्र, डॉ. पी. शिवस्वरूप

त्यांनी बाहेरच्या जगाशी तुलना न करता देशातील शिक्षण, संस्कृतीच्या अंतर्मनाचा ठाव घेऊन सध्याची शिक्षण व्यवस्था परिपूर्ण करावी, असे उद्‌बोधन भारतीय शिक्षण मंडळाचे संघटन मंत्री मुकुल कानिटकर यांनी केले.

इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठ व भारतीय शिक्षण मंडळ यांच्या वतीने राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या पदव्युत्तर शिक्षण विभागात एकदिवसीय संमेलनाचे आयोजन करण्यात आले. याप्रसंगी मुकुल कानिटकर प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते. व्यासपीठावर वर्धाच्या महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विद्यापीठाचे कुलगुरू प्रो. गिरीश्वर मिश्र, इग्नूचे केंद्रीय संचालक डॉ. पी. शिवस्वरूप, पदव्युत्तर शिक्षण विभागाच्या प्रमुख डॉ. राजश्री वैष्णव उपस्थित होते.

एकेकाळी भारताचे जगातील स्थान गुरूस्थानी होते. हे खरे असले तरी, हा भूतकाळ आहे. याला मागे ठेवून आज पुढची वाटचाल करावयाची आहे.

जगाला आपले महत्त्व सांगायची आवश्यकता नाही. त्यासाठी मागे लागू नये. त्यांना पटेल तेव्हा पटेल. पण आज आपल्याला स्वतःचे अस्तित्व शोधण्याची नितांत गरज आहे. सर्व देश आज यावर मंथनच नाही तर आंदोलने करत आहे. आज ब्रिटेन युरोपीयन युनियनपासून वेगळे होण्याचा मार्गावर आहे. चीन स्वतःचे अस्तित्व शोधत आहे. श्रीलंकेसारख्या लहान देशाने ब्रिटिशांनी दिलेले 'सिलोन' नाव बदलण्यासाठी १९८३ मध्ये आंदोलन पुकारले. म्यानमारनेही तेच केले. पण आपल्या देशात ही वृत्ती दिसून येत नाही. आपण प्रत्येक गोष्ट शासनावर सोडतो. संविधानाची ताकद ही समाज आहे.

पण ६८ वर्षांपासून शासनावर अवलंबून राहण्याची सर्वात वाईट सवय आपल्याला जडली आहे. एवढ्या वर्षानंतर आपल्या देशातील एक प्रमुख व्यक्ती देशाला स्वच्छ करण्यासाठी अभियान राबविण्याचे आवाहन करते. यात आनंद मानावा की आपल्या भारत मातेला अस्वच्छ केल्याचे दुःख? असा प्रश्न पडतो, असेही मुकुल कानिटकर म्हणाले.

आज विविध धर्म, जातीत विविधता असलेला, तरीही शांतिप्रिय देश म्हणून आपली ओळख आहे.

पण शिक्षणात आपण भरकटलो आहे. पूर्वीची ही शिक्षणातील श्रीमंती प्राप्त करण्यासाठी शिक्षकांची भूमिका महत्त्वाची आहे. कारण शिक्षक जोपर्यंत शिक्षित होत नाही तोपर्यंत कोणताही उपयोग नाही. त्यामुळे शिक्षणातील दोष दूर करण्यासाठी शिक्षकांनी पुढाकार घ्यावा असे आवाहन त्यांनी उपस्थित शिक्षकांना दिले.

यावेळी इग्नू नागपूर केंद्राचे संचालक डॉ. शिवस्वरूप यांनी २३ ते २५ फेब्रुवारी दरम्यान दिल्ली येथे होणाऱ्या आंतरराष्ट्रीय संमेलनाच्या पार्श्वभूमीवर हे संमेलन घेण्यात येत असल्याचे सांगितले.

प्रो. गिरीश्वर मिश्र म्हणाले, शिक्षकांनी स्वतःची गरिमा हरविली आहे. त्यामुळे पर्यायी शिक्षणव्यवस्था निर्माण झाली. यातून शिक्षणाचे ब्लॅकमेलिंग सर्रास सुरु असून शिक्षकांनी त्यांची जबाबदारी, भूमिका ओळखून कार्य करण्याची आवश्यकता आहे.

BENNETT, COLEMAN & CO. LTD. | ESTABLISHED 1838 | NAGPUR | FRIDAY, FEBRUARY 10, 2017 | 32 PAGES | PRICE ₹ 2.50

THE TIMES OF INDIA

NAGPUR TIMES

# 'Like black money, black education thriving in India'

Sarfaraz.Ahmed
@timesgroup.com



Pushpita Chatterjee

Mukul Kanetkar delivering the lecture on Thursday

**Nagpur:** Taking a dig at private coaching institutes, Mahatma Gandhi International Hindi University, Wardha, vice-chancellor Girishwar Misra on Thursday said just like black money, black education was thriving in the country.

"Why is education in colleges and universities not good enough to enable students qualify for IITs? Why is so much money being spent on taking coaching? Just like black money, black education has spread across the country," Misra said.

He was addressing teachers and lecturers during a one-day conference on 'Perennial Indian Education System: The Past, Present and Future' jointly organized by Indira Gandhi National Open University (Ignou), Bharatiya Shikshan Mandal (BSM) and PG department of Education of Nagpur University.

Misra said, "A lot of aspirants who have failed to join IAS have opened coaching centres for civil services exam. Formal education has become just a formality."

Besides Misra, Ignou regional director P Sivaswaroop, BSM's Mukul Kanetkar, head of PG education department Rajashree Vaishnav were present. Later, vice-chancellor of Kavikulguru Kalidas Sanskrit University Uma Vaidya and vice-chancellor of GH Raisoni University at Chhindwara Kamal Singh attended the valedictory function.

तरुण भारत
www.tarunbharat.net
आपलं नागपूर
गुरुवार, ९ फेब्रुवारी २०१७


# आज इग्नूतर्फे एकदिवसीय राष्ट्रीय संमेलन

तभा वृत्तसेवा
नागपूर, ८ फेब्रुवारी

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचा पदव्युत्तर विभाग, भारतीय शिक्षण मंडळ आणि इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठ (इग्नु) नागपूर केंद्राच्या वतीने ९ फेब्रुवारीला एकदिवसीय संमेलनाचे आयोजन विद्यापीठाच्या पदव्युत्तर शिक्षण विभागाच्या मदर टेरेसा सभागृहात करण्यात आले आहेत. सकाळी ९.३० वाजता संमेलनाचे उद्‌घाटन होईल. संमेलनाला वर्धेच्या महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विद्यापीठाचे कुलगुरू गिरिश्वर मिश्र, कवी कुलगुरू कालिदास संस्कृत विद्यापीठाच्या कुलगुरू डॉ. उमा वैद्य, छिंदवाडा जी. एच. रायसोनी विद्यापीठाच्या डॉ. कमल सिंह, महाराष्ट्र पशू व मत्स्य विज्ञान विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. ए. के. मिश्रा, रातुम विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद येवले प्रामुख्याने उपस्थित राहतील. इग्नु नवी दिल्ली आणि भारतीय शिक्षण मंडळाद्वारा आयोजित २३ ते २५ फेब्रुवारीदरम्यान तीनदिवसीय आंतराष्ट्रीय संमेलनाच्या पार्श्वभूमीवर हे संमेलन होत आहे. नागपुरातील संमेलनाचा विषय 'सर्वकालीन शिक्षण प्रणाली : भूतकाळ, वर्तमान आणि भविष्य' हा आहे. यात ६० पेक्षा अधिक विद्यार्थी प्रमुख सहा विषयांवर पेपरचे सादरीकरण करतील.

## गोंडवानामध्ये गुप्त अणुवर व्याख्यान

रॉयल सोसायटी ऑफ केमिस्ट्री आणि गोंडवाना विद्यापीठाच्या सहयोगाने गडचिरोलीच्या विद्यार्थ्यांसाठी विशेष व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे. यावेळी टाटा इन्स्टिट्यूट ॲण्ड रीसर्च सेंटरच्या अंकोना दत्ता 'गुप्त अणु' या विषयावर बीएससी आणि एमएससीच्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतील. गोंडवाना विद्यापीठात १० फेब्रुवारीला दुपारी २ वाजता हे आयोजन होणार आहे.

लोकशाही वार्ता

नागपूर वार्ता

गुरुवार, ९ फेब्रुवारी २०१७

# 'इग्नू'तर्फे शैक्षणिक संमेलन आज

**लोकशाही वार्ता/नागपूर**

भारतीय शिक्षण मंडळ आणि रा. तु. म. नागपूर विद्यापीठाच्या पदव्युत्तर शिक्षण विभाग यांच्या सहकार्याने 'इग्नू' नागपूरच्या वतीने 'सर्वकालीन भारतीय शिक्षण प्रणाली : भूतकाळ, वर्तमान आणि भविष्य' या विषयावर आधारित एक दिवसीय संमेलनाचे आयोजन उद्या, गुरुवारी सकाळी मदर टेरेसा सभागृह, लॉ कॉलेज कॅम्पस, अमरावती रोड येथे करण्यात आले आहे, अशी माहिती 'इग्नू'चे विभागीय संचालक डॉ. शिवस्वरूप यांनी पत्रपरिषदेत दिली.

सकाळी ९.३० ते सायंकाळी ५.३० पर्यंत चालणाऱ्या या संमेलनात वर्धा येथील महात्मा गांधी आंतराष्ट्रीय हिंदी विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. गिरीश्वर मिश्र, रामटेक येथील कवि कुलगुरू कालिदास संस्कृत विद्यापीठाच्या कुलगुरू डॉ. उमा वैद्य, छिंदवाडा येथील जी. ए. रायसोनी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. कमल सिंह, महाराष्ट्र पशू आणि मत्स्य विज्ञान विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. ए. के. मिश्रा, नागपूर विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. पी. जी. येवले यांच्यासह नामवंत संगणक तज्ज्ञ यशवंत कानेटकर आणि मुकुल कानेटकर हे मार्गदर्शन करतील.

प्राचीन काळातील नालंदा, तक्षशिला विद्यापीठापासून आताच्या आयआयटी आणि आयआयएमपर्यंत भारतीय शिक्षण प्रणालीने शैक्षणिक जगतात आपले एक प्रमुख स्थान निर्माण केले आहे. शंकराचार्य, गौतम बुद्ध, स्वामी विवेकानंद यांच्यापासून डॉ. एस. राधाकृष्णन, डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्यासारख्या शिक्षकांमुळेच भारताची जगात ओळख निर्माण झाली आहे. परंतु, जगाचा मार्गदर्शक बनण्यासाठी आणि आपल्या उज्ज्वल भविष्यासाठी आपल्याला आपले समृद्ध अनुभव सक्षम करण्याची गर आहे. हे संमेलन म्हणजे त्याच दिशेने टाकलेले एक पाऊल असल्याचे, डॉ. शिवस्वरूप यांनी सांगितले.

यानंतर 'इग्नू' नवी दिल्ली आणि भारतीय शिक्षण मंडळातर्फे 'भारताचे विचार' या विषयावर २३ ते २५ फेब्रुवारीदरम्यान एका आंतरराष्ट्रीय संमेलनाचे आयोजन करण्यात येणार आहे.

१० फेब्रुवारी रोजी गोंडवाना विद्यापीठाच्या सभागृहात 'इग्नू'चे विभागीय केंद्र आणि रॉयल सोसायटी ऑफ केमिस्ट्रीच्या सहकार्याने विज्ञानाच्या विद्यार्थ्यांसाठी एक व्याख्यान आयोजित केले आहे. टाटा इन्स्टिट्यूट ऑफ फंडामेंटल रिसर्च, मुंबइचे प्रसिद्ध वैज्ञानिक डॉ. अंकोना दत्ता 'जासूस अणु' या विषयावर गोंडवाना विद्यापीठ आणि 'इग्नू' गडचिरोलीच्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतील.

तरुण भारत
www.tarunbharat.net
आपलं नागपूर
रविवार, १२ फेब्रुवारी २०१७


# इग्नूतर्फे गडचिरोलीच्या विद्यार्थ्यांसाठी व्याख्यान



विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना अंकोना दत्ता, बाजूला डॉ. पी. शिवस्वरूप आणि डॉ. कल्याणकर

तभा वृत्तसेवा
नागपूर, ११ फेब्रुवारी

रॉयल सोसायटी ऑफ केमिस्ट्री, गोंडवाना विद्यापीठ आणि इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठ यांच्या वतीने गडचिरोलीच्या विद्यार्थ्यांसाठी विशेष व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे. यावेळी टाटा इन्स्टिट्यूट अँड रीसर्च सेंटरच्या अंकोना दत्ता 'गुप्त अणू' या विषयावर बीएसस्सी आणि एमएसस्सीच्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतील.

कार्यक्रमाला इग्नू नागपूर केंद्राचे संचालक डॉ. शिवस्वरूप आणि गोंडवाना विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. एन. व्ही. कल्याणकर उपस्थित होते. गुप्त अणुमुळे अनेक रोगांची शक्यता बळावते. त्यामुळे शरीरातील या अणुची चाचणी करणे आवश्यक आहे.

कारण उशीर झाल्यास कर्करोगाची शक्यता वाढते, असे अंकोना दत्ता म्हणाल्या. तसेच त्यांनी अणुपासून बचावाचे उपायही सांगितले. तर डॉ. कल्याणकर यांनी विद्यार्थ्यांना अशा गंभीर रोगाविषयी अधिक व्याख्याने आयोजित करण्याची आवश्यकता व्यक्त केली. तर डॉ. शिवस्वरूप यांनी रॉयल सोसायटीची माहिती दिली.

कार्यक्रमात चंद्रपूर, ब्रम्हपुरी आणि गडचिरोलीच्या विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. ■

देशोन्नती
वैचारिक क्रांतीचा अग्रदूत
नागपूर सोमवार, दि. १३ फेब्रुवारी २०१७ पृष्ठे ८+८ मूल्य ₹: ५



# कोचिंग सेंटर म्हणजे काळे शिक्षण : डॉ. गिरीश्वर मिश्र



प्रतिनिधी/१२ फेब्रुवारी

**नागपूर :** काळ्या पैशाप्रमाणेच देशात कोचिंग सेंटर हे काळे शिक्षण देणारे माध्यम उपलब्ध आहेत. हे माध्यम उखडून फेकण्याची गरज आहे. त्याचप्रमाणे शिक्षक आणि विद्यार्थ्यांमध्ये परस्पर विश्वासाचे वातावरण निर्माण करण्याची खरी आवश्यकता आहे, असे परखड मत वर्धा येथील महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. गिरीश्वर मिश्र यांनी व्यक्त केले.

इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठाचे (इग्नू) नागपूर केंद्र आणि भारतीय शिक्षण मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने अमरावती मार्गावरील राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या स्नातकोत्तर शिक्षण विभागात सर्वकालीन 'भारतीय शिक्षण प्रणाली : भूत, वर्तमान आणि भविष्य' या विषयावर एक दिवसीय संमेलन आयोजित करण्यात आले होते. या संमेलनाचे उद्घाटक म्हणून ते बोलत होते. प्रमुख अतिथी म्हणून रामटेक येथील कवी कुलगुरू कालिदास संस्कृत विद्यापीठाच्या कुलगुरू डॉ. उमा वैद्य, छिंदवाडा येथील जी.एच. रायसोनी विद्यापीठाच्या कुलगुरू डॉ. कमल सिंह, इग्नूच्या नागपूर केंद्राचे संचालक डॉ. पी. शिवस्वरूप, संगणक तज्ज्ञ मुकुल कानेटकर प्रामुख्याने उपस्थित होते.

डॉ. कमल सिंह यांनी त्यांच्या भाषणात देशाच्या विकासासाठी विद्यार्थ्यांनी योगदान देण्याचे आवाहन केले. मुकुल कानेटकर म्हणाले, प्राचीन विद्यापीठ नालंदा, तक्षशीला ही भारतीय शिक्षणाची संस्कृती आहे. या संस्कृतीचा अभिमान बाळगून आपण देशासाठी नव्हे तर जगासाठी काम केले पाहिजे. भारतीय शास्त्रांचा हवाला देऊन भारतीय संस्कृतीत शिक्षण घेण्यासाठी सर्वांनाच दारे खुली असल्याचे त्यांनी सांगितले. डॉ. राजश्री वैष्णव यांनी स्वागतपर भाषण केले. तर, डॉ. शिवस्वरूप यांनी यानंतर पार पडलेल्या चर्चासत्रात डॉ. राजेश बिनीवाले, यशवंत कानेटकर यांनी त्यांचे विचार मांडले. या संमेलनात एकूण ६९ शोधनिबंध सादर करण्यात आले. डॉ. एस.आर. कोमावार, प्रो.टी. श्रीनिवासू, डॉ. एस.आय. कोरेटी, डॉ. के.एम. वाट, डॉ. विकास सिंघल, डॉ. येलेकर, डॉ. निंबारते यांच्या अध्यक्षतेखाली या निबंधाचे वाचन करण्यात आले. या संमेलनात नागपूर, भंडारा, रामटेक, गोंदिया, रायपूर, वर्धा येथील प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते.

■ Published simultaneously from NAGPUR, RAIPUR, JABALPUR, BHOPAL • THURSDAY • FEBRUARY 16 • 2017 26 Pages

The Hitavada

NAGPUR

# *IGNOU* holds conference for Gadchiroli students

■ **Business Bureau**

INDIRA Gandhi National Open University (IGNOU) Nagpur Regional Centre has organised various special academic activities for Gadchiroli students and on Indian education system. One day conference on 'Perennial Indian education system: The past, present and future' was held in collaboration with Bharatiya Shikshan Mandal (BSM) and PG Department of Education, RTM Nagpur University.

There was a overwhelming response with 69 participants presented their papers and three vice chancellors addressed the delegates. Dr Girishwar Mishra, Vice Chancellor of Mahatma Gandhi Antarrashtriya Hindi Vishwa Vidyalaya, Wardha was the chief guest for the inaugural function.

He advised the participants to create a perfect environment in the class where teacher and students have mutual trust.

He said, "We have black education in the country which is in the form of coaching centres and tuition classes.



Mukul Kanetkar, BSM emphasised that India has a great heritage in the world of higher education starting from Nalanda, Takshashila.

Based on this heritage it should work for present and future educational needs of India and entire world, informs a press release issued here.

The Gadchiroli activity was sponsored by Royal Society of Chemistry (RSC), West India Section in collaboration with Gondwana University.

Dr Rajshree Vaishnav presented the welcome address and Dr Sivaswaroop, Regional Director of IGNOU proposed the vote of thanks.

The session was attended by IGNOU and Gondwana University students from Gadhiroli, Bramhapuri and Chandrapur.

आप पढ़ रहे हैं देश का एकमात्र नो निगेटिव अखबार
# दैनिक भास्कर
सहित) मूल्य ₹4.50
नागपुर, सोमवार, 27 फरवरी 2017 | फाल्गुन शुक्ल-1, 2073

# भारत 122 भाषाओं के साथ विविधता में एकता का देश : डॉ शिवस्वरूप

- यूजीसी ने विश्वविद्यालयों को जारी किए देश की विभिन्न भाषाओं के साथ मातृभाषा दिवस मनाने के निर्देश



सिटी भास्कर | नागपुर. इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विश्वविद्यालय (इग्नू) के नागपुर क्षेत्रीय केंद्र द्वारा मातृभाषा दिवस मनाने के लिए 10 विभिन्न भाषाओं के विशेषज्ञों को एवं छात्रों को आमंत्रित किया गया। प्रस्तुतकर्ता बंगाली, गुजराती, पंजाबी, उर्दू, कन्नड, मलयालम, तमिल, तेलुगु, मराठी और हिंदी भाषी थे। इस दौरान इग्नू के क्षेत्रीय निदेशक डॉ. पी. शिवस्वरूप ने उद्घाटन भाषण में कहा कि यूनेस्को ने हर साल 21 फरवरी को दुनिया भर में मातृभाषा के प्रचार-प्रसार और सांस्कृतिक परंपरा की जागरुकता को बढ़ावा देने के लिए अंतरराष्ट्रीय मातृभाषा दिवस मनाने का निर्णय लिया। यूजीसी द्वारा सभी विश्वविद्यालयों को देश की विविध भाषा के साथ इसे मनाने के निर्देश दिए गए हैं। उन्होंने कहा कि भारत 122 भाषाओं के साथ विविधता में एकता का देश है। जमशेद सिंह कपूर, इग्नू, के छात्र ने पंजाबी मातृभाषा के बारे में कहा कि पंजाबी भाषा 600 ईसा पूर्व में शुरू हुई और यह पाकिस्तान में 70 प्रतिशत लोगों द्वारा बोली जाती है। डॉ. रेशमी उमेश मलयालम भाषी ने कहा कि 38 लाख लोग मलयालम बोलते हैं। ज्योत्सना चारी ने कहा कि यक्षगान कन्नडीकला का प्रकार है। प्रो. एस.पी. संगल ने बंगाली भाषा के बारे में कहा कि यह एक संस्कृत आधारित भाषा है। उन्होंने रवींद्र संगीत भी गाया। सुश्री दिलनार नोशिर रनडेलिया, इग्नू की छात्रा ने गुजराती और पारसी भाषाओं के बारे में कहा कि पारसी परशिया और ईरान के शरणार्थी हैं और कुछ सदियों पहले के पश्चिमी तट पर स्थाई हुए। डॉ. विकास सिंघल, सहायक क्षेत्रीय निदेशक, इग्नू ने अपनी मातृभाषा हिन्दी के बारे में कहा कि हिन्दी दुनिया में सबसे ज्यादा बोली जाने वाली चौथी भाषा है। डॉ. रमेश ठाकरे, विश्व बैंक के पूर्व सलाहकार ने अपनी मातृभाषा मराठी के बारे में संत तुकाराम का उल्लेख करते हुए कहा कि भाषा धन है। तमिलनाडु कला और नोबेल पुरस्कार विजेताओं, भरतनाट्यम आदि जैसे संस्कृति की समृद्ध परंपरा है।

■ Published simultaneously from NAGPUR, RAIPUR, JABALPUR, BHOPAL • THURSDAY • FEBRUARY 9 • 2017 26

The Hitavada

NAGPUR

# IGNOU Nagpur Regional Centre plans special academic activities

■ Business Bureau

IGNOU Nagpur Regional Centre in collaboration with other organisations, has planned special academic activities.

In collaboration with Royal Society of Chemistry (London) and Gondwana University, an event is planned at Gadchiroli. Science students, (especially in remote areas,) get a rare opportunity to know the frontiers of Science. Providing them opportunity to listen to experts, will stimulate their interest in Science. IGNOU Regional Centre will be collaborating a Royal Society of Chemistry sponsored popular talk to be organised at Gondwana University, Gadchiroli.

Well-known chemical scientist from Tata Institute of Fundamental Research (TIFR), Mumbai Dr (Mrs) Ankona Datta will be delivering a talk on 'Spy Molecules' for students of Gondwana University and IGNOU from Gadchiroli. Diseases are caused by dysfunction of molecules in the body. It is scheduled on February 10, 2017, 2.00 pm at Gondwana University.

In collaboration with PG Department of Education, RTM Nagpur University and Bharatiya Shikshan Mandal, a one-day conference is scheduled at Nagpur. IGNOU, New Delhi and Bharatiya Shikshan Mandal (BSM) are organising an international conference in New Delhi on 'Idea of Bharat' from February 23 to February 25, 2017. It will be inaugurated by his Excellency The President of India.

As a pre-conference for this, IGNOU Nagpur Regional Centre scheduled a one-day conference on 'Perennial Indian Education System: The Past, Present and Future' in collaboration with Bharatiya Shikshan Mandal and PG Department of Education, RTM Nagpur University. It is scheduled on February 9, 2017 from 9.30 am to 5.30 pm. Starting from Vedic period to Nalanda, Takshashila universities to present day IITs and IIMs, India is well-known globally. Not only the institutions but the gurus like Shankaracharya, Gautam Buddha, Swami Vivekananda to Dr S Radhakrishnan, Dr A P J Abdul Kalam.

Distinguished academicians like Prof Girishwar Misra, Vice-Chancellor, Mahatma Gandhi Antarrashtriya Hindi Vishwa Vidyalaya, Wardha, Dr Uma Vaidya, Vice Chancellor, Kavikulaguru Kalidas Sanskrit University, Ramtek, Dr Kamal Singh, Vice Chancellor, G H Raisoni University, Chhindwara, Dr A K Mishra, Vice Chancellor, Maharashtra Animal & Fishery Sciences University, Dr P G Yeole, Pro-Vice Chancellor, RTMNU, Yashwant Kanetkar, computer expert and Mukul Kanetkar of BSM will address the conference. Venue is Mother Teresa Hall, PG Department of Education, Law College Campus, informs a press release by Dr P Sivaswaroop.

आप पढ़ रहे हैं देश का सबसे विश्वसनीय और नंबर 1 अखबार

दैनिक भास्कर

SUNDAY

नागपुर 12 फरवरी 2017

# 'हममें है विश्व गुरु बनने की क्षमता'




## ▪ इग्नू के सम्मेलन में विशेषज्ञों ने कहा

नागपुर | इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विश्वविद्यालय (इग्नू) क्षेत्रीय केंद्र नागपुर द्वारा गड़चिरोली के छात्रों के लिए और भारतीय शिक्षा प्रणाली पर एक दिवसीय सम्मेलन का आयोजन किया गया। सम्मेलन का विषय 'सार्वकालिक भारतीय शिक्षा प्रणाली अतीत, वर्तमान और भविष्य' था।

भारतीय शिक्षण मंडल और स्नातकोत्तर शिक्षण विभाग, राष्ट्रसंत तुकड़ोजी महाराज नागपुर विश्वविद्यालय के सहयोग से आयोजित सम्मेलन में 69 प्रतिभागियों ने बढ़-चढ़कर भाग लिया और अपने शोध पत्र प्रस्तुत किए एवं 3 कुलपतियों ने सभी को संबोधित किया। डा. गिरीश्वर मिश्र, कुलपति, महात्मा गांधी अंतरराष्ट्रीय हिंदी विश्वविद्यालय, वर्धा उद्घाटन समारोह के लिए मुख्य अतिथि थे। उन्होंने प्रतिभागियों को कक्षा, जहां शिक्षक और छात्र परस्पर विश्वास में एक संपूर्ण वातावरण बनाने की सलाह दी। मुकुल कानेटकर, भारतीय शिक्षण मंडल ने अपने संबोधन में भारत शुरू से ही नालंदा, तक्षशिला जैसे उच्च शिक्षा के लिए पूरी दुनिया में एक महान विरासत होने पर बल दिया। यह सत्र डा. एस.आर. कोमावार, प्रो.टी. श्रीनिवास, डा. एस.आय.कोरेटी, डा. के.एम. वाट, डा. विकास सिंघल, डा. येलेकर, डा. निंबारते जैसे वरिष्ठ शिक्षाविदों की अध्यक्षता में हुआ था। समापन समारोह के मुख्य अतिथि डा. उमा वैद्य, कुलपति, कवि कुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालय, रामटेक थे। सम्मेलन में नागपुर, भंडारा, रामटेक, गोंदिया, रायपुर, वर्धा के शिक्षण विभाग के अध्यापक एवं छात्र शामिल थे। डा. पी. शिवस्वरूप, क्षेत्रीय निदेशक, इग्नू ने रॉयल सोसायटी ऑफ केमिस्ट्री और उसकी गतिविधियों के बारे में छात्रों को जानकारी दी।